# घुमक्कडी

कविता महाजन

राजहंस प्रकाशन

# घुमक्कड़ी

# माझी साहित्यिक मैत्रीण...

**ओळख आणि वाचनमैत्री...**

कविता महाजन आणि माझी ओळख कधीच होईलसं वाटलं नव्हतं. माझ्या पत्रकारितेच्या रांगत्या काळात आलेल्या 'ब्र' आणि 'भिन्न' कादंबऱ्यांनी या लेखिकेभोवती 'बंडखोर' आणि 'स्त्रीवादी' ही बिरुदं लागली होती. ज्याचा पुढल्या सगळ्याच काळात आदरयुक्त दबदबा होता. सदरांतून, लेखांतून तसंच मिळत जाणाऱ्या पुरस्कारांतून नंतरच्या काळात माझ्यासाठी हे नाव इतकं मोठं बनत चाललं होतं, की हयातीत आपलं यांच्याशी कधी संभाषण होऊ शकणार नाही, अशी मनोमन खात्री पटली होती. पुढे २०११नंतर मी ठाण्यातून अडीच वर्षं बदलापूरला स्थलांतरित झालो आणि वाचनाचं स्थलांतर मराठीतून प्रामुख्यानं इंग्रजी-हिंदी कथात्म साहित्याकडे झालं. पुन्हा ठाण्यात आल्यानंतर साधारणत: २०१४-१५ साली बहुधा मराठी कथनसाहित्याची आणि वाचकांची सद्य:स्थिती यावर भवतालातील निरीक्षणांतून 'लोकप्रभा' साप्ताहिकात काही आठवड्यांच्या अंतरानं मी तीन लेख लिहिले होते. त्यांतील भाषा अत्यंत उग्र होती. बुरसटलेल्या समीक्षकांपासून आपलं 'डबकं' विस्तारत नेणाऱ्या वाचनगुरूंची (यांना वाचनगुरव हा शब्द योजलेला आठवतो.) नव्या लेखनाकडे फिरवली जाणारी पाठ आणि जुन्यांना कुरवाळणाऱ्या प्रवृत्तीबद्दल त्यात भरपूर टीकासुख घेतलं होतं. या तीव्र टीका असलेल्या तीन-टोकी लेखाच्या खाली प्रतिक्रियेसाठी असलेल्या कार्यालयीन इ-मेलपत्त्यावर 'कविता महाजन' हे ओळखीचं नाव झळकलं आणि माझ्या छातीत धडकीच भरली.

'तुमच्याशी तातडीनं बोलायचंय. तुमचा फोन नंबर द्या. शिवाय सवडीनं बोलता येईल अशी वेळ कोणती, हेही सांगा.' हा त्या इ-मेलमधील मायना होता.

लिहिलेल्या टीकालेखांबद्दल आपल्याला आता या भरपूर सोलटून काढणार, ही मनात धाकधूक असताना त्यांना माझा मोबाईल नंबर पाठवला आणि दुपारी तीन वगैरे वाजता निवांत बोलता येईल, असं कळवलं.

दुसऱ्या दिवशी बरोब्बर तीन वाजता फोन वाजला आणि या नावाबाबतचा माझ्या मनातील पूर्वाश्रमीचा दबदबा तसेच टीकालेखांबद्दल होऊ शकणाऱ्या चंपीबाबतचा संशय दूरच पळाला. पहिल्या दिवशी आणि पहिल्यांदाच सुरू झालेलं बोलणं मराठी-हिंदी आणि इंग्रजी वाचनाच्या तपशिलांनी वाढतच राहिलं आणि तब्बल दोन-सव्वादोन तासांच्या पलीकडे गप्पा रंगत गेल्या. त्या इतक्या, की नाईटशिफ्टला जाण्यासाठी माझ्या ऑफिसची गाडी चुकली. आधी त्यांनी माझ्या वयाचा हिशेब मांडला. पस्तिशीच्या मानानं वाचन आणि त्यावर पुढे किती वर्षं लेखन करण्याची चूष टिकू शकते, याचा आराखडा माझ्यासमोर तयार केला.

'ज्या प्रकारचे लेख लिहिलेत, तसेच आणि त्याच तीव्रतेनं अधिकाधिक येऊ देत. तुमची खदखद-राग आणि निरीक्षणं अगदीच अचूक आहेत. आज जे साहित्यव्यवहारात सुरू आहे, त्यावर खरंखुरं कुणी लिहीतच नाही. त्यामुळे अशा प्रकारचं लिखाण सातत्यानं येत राहिलं, तर नक्की काय चुकतंय, याचा एक विस्तृत तपशील हाती येईल. बदलाची गोष्ट नंतरची, आधी चूक काय आहे, हे वाचकांना आणि साहित्यधुरिणींना समजायला हवं.' ही त्यांची माझ्या लेखनावरची प्रतिक्रिया होती.

पुढल्या आठवड्यात त्यांचा फोन आला तो 'बुकमार्क' या आमच्या पानावरील माझ्या लेखाच्या संदर्भात. त्यात वापरलेल्या भाषेबद्दल आणि 'कॉइन' केलेल्या शब्दांचे कौतुक करणारा. त्या वेळी माझ्या रोजच्या इंग्रजी कथावाचनाचा वेग खूप होता. आपल्या इथल्या कथाजाणकारांचा पैस 'न्यू यॉर्कर', 'पॅरिस रिव्ह्यू' यांच्यापासून फारफार तर 'ग्रँटा'पर्यंत मर्यादित असतो. मी त्या वेळी या नेहमीच्या अंकांसह 'बार्सिलोना रिव्ह्यू', 'व्हर्जिनिया क्वार्टरली रिव्ह्यू', 'प्लोशेअर मॅगझिन', 'अटलांटिक' यांचे अर्काइव्ह खणत होतो आणि नव्या-जुन्या लेखकांच्या उत्तम कथांच्या वाचनाचा आनंद घेत होतो. कविता महाजन यांच्याशी यांतल्या कथांवर चर्चा केल्या, तेव्हा त्यांनी 'या मासिकांतील तुम्हाला आवडणाऱ्या निवडक, वाचाव्याच अशा कथा मला वाचायला द्याल का?' विचारलं. पुढल्या काही दिवसांत त्या कथांमुळे आमच्या गप्पा आणि फोनसंवाद वाढला. रॉबर्तो बोलानोच्या 'सेन्सिनी'पासून एलिझाबेथ गिल्बर्ट, जेनिफर इगन यांचे बंडखोर लेख आणि कथा, जो

लॉयड या ब्रिटिश लेखिकेची 'द ग्राऊंड द डेक' ही विलक्षण कथा दिल्याचे आणि त्यांनी ते सारं वाचल्याचं अजूनही आठवतं. याशिवाय हिंदीतील माझ्या समकालीन वाचनातील लेखकांपैकी पंकज मित्र, गीत चतुर्वेदी, इंदिरा दांगी, आशुतोष, विमल चंद्र पाण्डेय, मनोजकुमार पाण्डेय, कुणाल सिंह यांच्या कथालेखनावर भरभरून चर्चा केल्याचंही आठवतं. त्यांनी त्यात कित्येक अभिजात आणि मधल्या काळातील लेखकांची नावे मला सुचविली. त्या साऱ्या संवादात नवं आणि वेगळं वाचण्याचं कुतूहल असलेली लेखिका म्हणून कविता महाजन यांची प्रतिमा माझ्या मनात ठसली.

या फोनचर्चा काळातच मराठी साहित्यविश्वात त्यांना आलेल्या बऱ्या-वाईट अनुभवांची एक मोठी गाथाच त्यांनी मला एके दिवशी ऐकवली. तेव्हाच कादंबऱ्यांव्यतिरिक्त त्यांचे संपादनातील, भारतीय लेखिका मराठीत आणण्याच्या प्रकल्पासह बालसाहित्य आणि इतर लेखनाचे दडपवून टाकणारं स्वरूप मला कळलं. नंतरच्या काही दिवसांत मला 'अरे-तुरे' म्हणण्याइतपत त्या माझ्या साहित्यिक मैत्रीण झाल्या. पुढे माझ्या पिढीच्या मित्र-मैत्रीण वर्तुळात कितीतरी जणांशी त्यांचा उत्तम परिचय आणि संवाद असल्याचं कळत गेलं.

**हितचिंतक आणि पंचाईतपूर्ती...**

कविता महाजन यांच्याशी ओळख झाल्याच्या वर्षभरामध्ये मी त्यांच्यापासून लपवून ठेवलेली कुठली गोष्ट असेल, तर ती म्हणजे माझं स्वत:चं कथालेखन. एक तर त्या कथांचा विषय हा पूर्णपणे 'पुरुषवादी'. त्यात पोर्नशी संबंध असलेल्या त्यांतील व्यक्तिरेखांची स्त्रीसमज यथातथा. मराठीतील बोटावर मोजण्याइतक्या नियतकालिकांच्या, दिवाळी अंकांच्या बोटावर मोजता येतील इतक्या संपादकांनी 'या कथाच नाहीत बुवा' आणि उरलेल्यांनी 'कथा वाचायला आवडताहेत, पण छापल्या तर गजहब होईल' असा सूर काढून माझ्या कथालेखन आत्मविश्वासाला पंक्चर करून ठेवलं होतं. त्यामुळे त्या मुद्दामहून कुणाला दाखवण्याबाबत माझी मन:स्थिती राहिलेली नव्हती. तोच तिसऱ्याच कोणत्यातरी व्यक्तीकडून त्यांना माझ्या ढेपाळत चाललेल्या कथालेखनाविषयी कळले आणि त्यांनी मला त्या कथा वाचायला मागितल्या. तेव्हा पाच कथांचा जुडगा मी त्यांना भीत भीत मेल केला. ही 'बंडखोर' आणि 'स्त्रीवादी' लेखिका या कथा वाचून माझ्याविषयी असलेल्या बऱ्या मताला बदलून मला शिव्या घालणार,

असा काहीसा माझा होरा होता. पण झालं उलटंच. या कथांमधील साऱ्या तिरकस व्यक्तिरेखा आणि वर्णनं यांची त्यांनी मुक्तकंठानं स्तुती केली. 'या कथा कोणीच छापत नाही, तर नको छापू देत. तुझ्या डोक्यातून येत असलेल्या कथामालिकेला फक्त तुझ्यासाठी पूर्ण कर.' गंमत म्हणजे त्याच वर्षी तीन दिवाळी अंकांनी पहिल्या कथा छापल्या. दोन कथा ऑनलाइन आल्या आणि त्याच्या पुढल्या वर्षी 'डावलच्या स्वप्नांत पतंगी' ही कथा 'ऐसी अक्षरे' या संकेतस्थळावर ऑनलाइन प्रसिद्ध झाली. ही कथा प्रसिद्ध झाल्यानंतर फेसबुकवर त्यांनी तिची लिंक देऊन 'पंकज भोसलेची ताजी कथा. आजच्या ताज्या लेखकांत हाच एकमेव लेखक वाचावासा वाटतो.' अशी पोस्ट केली. ती कथा त्यांना इतकी आवडली होती, की 'तातडीनं तुझ्या सहा कथांचे प्रिंटआउट मला पाठव.' हा सांगणारा त्यांचा अतिउत्साही फोन आला. त्या त्यांना पाठवल्या. त्यांनी त्यावर टिपण लिहून ते परस्पर 'राजहंस प्रकाशना'ला पाठवलं. 'हे पुस्तक तुम्हीच करायचं.' हा आग्रह धरत. कविता महाजनांनी ते टिपण काही मला दाखवलं नाही. पण काही महिन्यांनी माजगावकर सरांचा मला फोन आला. ''कविता माझ्याशी भांडतेय, हे पुस्तक तुम्हीच करा म्हणून.'' मी पूर्णपणे धक्क्यात. कारण माझ्या प्रस्तावित कथा पूर्ण झाल्या नव्हत्या. त्या पूर्ण होईस्तोवर कोणत्याही प्रकाशकाकडे जाण्याचंही माझ्या मनात नव्हतं. शिवाय 'तुझ्या कथांच्या पुस्तकासाठी राजहंस प्रकाशनाकडे मी शब्द टाकतेय किंवा टाकलाय', याचीही मला कल्पना कविता महाजन यांनी दिली नव्हती. थेट माजगावकरांचा फोन आल्यानंतर मी गप्प-गार. मी कविता महाजनांना याबाबत फोन केला, तर त्यांची माजगावकरांबद्दलची खदखद अवस्था कायम. ''तू गप्प बस. मी त्यांना सांगितलंय. राजहंसकडूनच तुझं पुस्तक येईल. त्याला कथासंग्रह नाही म्हणायचं. यातील कथा जोडकथा असल्यामुळे या सगळ्याला कादंबरीच म्हणायचं. कसे छापत नाही ते मी पाहतेच.'' कथामालिका पूर्ण होण्याआधीच मला विचित्र चरकात पिचला जात असल्याची जाणीव झाली. कविता महाजन यांना माझ्या कथांचं भलं करायचं होतं आणि त्याबाबत त्यांचा हेतू हितचिंतकाचाच होता. पण राजहंस प्रकाशनाकडे त्यांनी माझ्यासाठी हट्ट करावा, हे मला रुचलं नव्हतं. मी त्या वेळी पुण्यात जाऊन माजगावकरांना त्यांच्या वाडेश्वर अड्ड्यावर भेटलो. 'आधीच्या कथांवरून आमच्या संपादकांना याचं पुस्तक आम्ही करावंसं वाटत नाही.,' हे त्यांनी स्पष्ट सांगितलं. माझं त्यावर काहीही म्हणणं नव्हतं.

कथांना नकार पाचवीला पुजला असल्यानं दु:ख वाटण्यापलीकडे स्थिती गेली होती. शिवाय माझ्या अजून पाच कथा लिहायच्या शिल्लक होत्या. पण या निमित्तानं माजगावकरांशी विविध विषयांवर झालेल्या गप्पा आणि ओळख ही मला सर्वात मोठी उपलब्धी वाटली होती. पण नंतरही कविता महाजन यांना माझं या कथांचं पुस्तक राजहंसकडून येईलच असा ठाम विश्वास होता. या सगळ्या प्रकारानंतर राजहंस प्रकाशनाच्या औरंगाबाद शाखेतून श्याम देशपांडे यांचा मला फोन आला. मी त्यांना अजिबातच ओळखत नव्हतो. त्यांच्याशी पहिल्यांदाच बोलत होतो. त्यांचा पुढला संवाद होता ''पुण्याला माजगावकरांना भेटायला चाललोय. कालच कविताशी तुमच्या कथांविषयी बोलणं झालं. मी त्यांच्याशी एकदा बोलतोच. तुम्ही निश्चिंत राहा. तुमचं पुस्तक राजहंसकडूनच येईल.'' म्हणजे माझ्या पुस्तकाबाबत सर्वार्थानं पडदा पडल्यानंतरही कविता, माजगावकरांकडे आडमार्गानं माझी शिफारस करीत होत्या. मला त्यांना काही बोलता येईना आणि माजगावकरांनाही जे काही चाललंय, ते सांगता येईना, अशी माझी पंचाईत कविता महाजन यांनी माझ्या कथांवरील प्रेमापोटी करून ठेवली होती.

**मार्गदर्शक आणि टीकाकर्ती...**

पुढल्या सगळ्या काळात कविता महाजन यांचे फोन त्यांच्या फिरस्तीच्या काळात यायचे. कधी हिंदीतल्या कादंबरीचा अनुवाद त्या करीत होत्या, त्यासंदर्भात यायचे आणि माझ्या कथांचं पुढे काय चाललंय, त्या पूर्ण होतायत की नाही,हे विचारण्यासाठी यायचे. एकदा 'आर्टफिल्ममधील हिरोईनीसारखी' कथा प्रचंड आवडल्याचा प्रदीर्घ फोन आला. तर 'शेरिल क्रोसारखी दिसणारी मुलगी' ही कथेऐवजी 'लेख-कथा' झाल्याचं सांगणारा आणि 'तू पत्रकार आणि लेखक स्विच-ऑन-स्विच-ऑफ न करता ही कथा लिहिलीस. पहिले त्या कथेचा आकार कमी कर, मग त्याचं स्वरूप लेख-कथेवरून कथेवर आण,' हा त्यांचा आग्रह होता. मी त्यांना, मुद्दाम आणि जाणीवपूर्वक लेख-कथा असं हिचं स्वरूप ठेवलंय. त्यामुळे तिची लांबी मोठी झाली, हे सांगायला लागलो. तर त्यांनी मला या कथेत वाचणारा किती थकून जातो, हे समजावून पाहिलं. त्यावर मी पुन्हा वाचताना थकवा यावा, हाच माझा हेतू आहे, हे स्पष्ट केलं. त्यानंतर त्यांनी मग कथेवर सणकून टीका केली. ही कथा वाचनीय आहे. पण नुसती वाचनीयता असून चालणार नाही. कथेच्या चौकटीत आणि नियमांत ती राहायला हवी. ती

तू मुद्दाम मोडू नको, असा सल्ला दिला. पण नंतर तू जाणीवपूर्वक अशी मोड-तोड करायचं ठरवलंच आहेस, तर तुला वाटते तशीच ठेव. इतर कुणीही तुला कथेतून जे सांगायचं, ते सांगू शकणार नाही. मीदेखील नाही, असं सांगत त्यांनी चर्चेचा विषय दुसरीकडे वळवला. त्यांच्याशी तीन-एक वर्षं फोनवर बोलत असतानाही आमच्या भेटीचा योग काही आला नाही. एकदा गणेश मतकरी आणि मी त्यांना भेटण्यासाठी वसईकडे निघालोही होतो. पण त्यांना कुठंतरी बाहेर जायचं असल्यानं ते पुढे ढकललं गेलं. 'विश्वामित्र सिण्ड्रोम' संग्रह येण्याआधी त्यातल्या ९ की १० कथांपर्यंत त्यांचं वाचन झालं होतं. 'मालिका पूर्ण होऊ दे. मग माजगावकरांशी पुन्हा बोलते', हे त्यांचं अधून-मधून सुरूच असायचं. २०१८ साली मी खारघरला राहायला आलो. माझ्या पुण्याच्या पुस्तकवाऱ्या वाढायला लागल्या. त्या वेळी त्या वसईवरून पुण्यात स्थलांतराच्या विचारात होत्या. त्या पुण्यात आल्या, तेव्हा 'एकदा घर लावलं, की निवांत गप्पा मारायला ये.' म्हणाल्या. पण पुढल्या काही दिवसांत ते जमलं नाही. पण एके संध्याकाळी पानांची गडबड सुरू असताना अचानक त्यांच्या मृत्यूची बातमीच धडकली. त्या वृत्ताची शहानिशा करीत बातमीवर सोपस्कार करून ती पानावर डकवताना आदल्या काही वर्षांत या साहित्यिक मैत्रीणीशी झालेल्या गप्पांतल्या कितीतरी गोष्टी आठवत राहिल्या. माझ्या पुस्तकाला मराठीतील सर्वोत्तम प्रकाशक लाभावा. माझ्या कथांना एकत्रितरीत्या कादंबरी म्हणून छापलं जावं, यासाठी त्यांचा हट्ट आठवत राहिला. त्या मृत्यूवार्तेनंतर पुढील काही दिवस फेसबुकवर पडणारा त्यांच्यावरच्या प्रेमाचा वर्षाव पाहिला; तेव्हा त्यांच्या अशा निर्व्याजी, निर्हेतूक मैत्रीचे माझ्यासारखेच किती लाभार्थी होते, याची कल्पना आली. नंतर काही नव्यानं झालेल्या मैत्रिणींशी त्या माझ्याइतक्याच जवळ असल्याचे दाखले मिळत गेले. रोहन प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झालेले 'विश्वामित्र सिण्ड्रोम' मी कविता महाजन यांना अर्पण का केलं, हे मी थोडक्यात लिहिलंय. या कथा पुस्तकरूपात पाहताना त्यांना माझ्याहून अधिक आनंद झाला असता, हे खरंय. एका क्षणी कशाला लिहायच्या या कथा, वाटत असताना त्यांनी या पूर्ण करण्यासाठी माझा पिच्छा पुरवला होता. अन् पुस्तक पूर्ण झालं नसतानाही ते छापलं जाण्याची हमी मिळावी, म्हणून माजगावकरांचा. अन् कथा लिहून पूर्ण झाल्या, तेव्हा शेवटच्या दोन कथा वाचायला त्याच नव्हत्या. त्यांच्या मृत्यूनंतर मी त्यांच्याबद्दल आणि त्यांच्याशी असलेल्या

परिचयाबद्दल कधीच लिहायचं नाही, असे ठरवलं होतं, जे कविताच्या शेवटच्या पुस्तकानिमित्तानं मोडावं लागतंय.

## घुमक्कड आणि घुमक्कडी...

मराठीत अपवादात्मकरीत्या चांगलं प्रवासवर्णन वाचायला मिळतं, असा माझा ठाम दावा कैक वर्षांपासून आहे. म्हणजे अगदी महाराष्ट्राच्या लाडक्या, उपलाडक्या, नवकथेच्या प्रथम शिलेदारापासून गावरान मातीच्या गोष्टी लिहिणाऱ्या लेखकांनी आपल्या देशी-विदेशी वाऱ्यांची स्व-कुतूहलात्मक आणि स्व-प्रेमात्मक अशा प्रवासवर्णन लिहिण्याचा झपाटा गेली ७०-८० वर्षं ठेवला. पण त्यात आदरानं घ्यावं असं एकच नाव निघतं, ते म्हणजे रा. भि. जोशी. 'उथव', 'वाटचाल' या त्यांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाचा दर्जा हा नंतर निघालेल्या 'ग्रँटा' तसेच न्यू यॉर्कर, जीक्यू, हार्पर्समधील दीर्घ प्रवासलेखांच्या तोडीचा. बरे रा.भिं.चं हे लेखन केव्हाचं, तर १९६० आणि ७०मधल्या भरभराटीच्या सत्यकथा काळातलं. देशातील धार्मिक स्थळांपासून शहरमाहात्म्य असलेल्या ठिकाणांवरील त्यांचे खणखणीत लेखन आज वाचतानाही त्यांतील धोपटवजा शैलीच्या कुणीही प्रेमात पडावं.

सरधोपटता वजा केली, की तुम्हाला थोडं अधिक चांगलं लिहिता येऊ शकतं, हे नोरा एफ्रॉन या विदूषीचं तत्त्वज्ञान कविता महाजन यांनी त्यांच्या कथात्म लेखन काळातच ओळखलं होतं. अकथनात्मक लेखन, अनुवादासाठी देशाच्या कानाकोपऱ्यांतील लेखक-लेखिकांचं वाचन. संपादन या सर्व काळात त्यांच्या लेखणीला धार आलेली दिसते. रा.भिं.च्या प्रवास लेखनकुळाशी बरंचसं जवळचं नातं सांगणाऱ्या 'घुमक्कडी' या पुस्तकामध्ये प्रवासाच्या गोष्टी आणि गोष्टींचा प्रवास आहे. तो किती खोलवर आहे, याचा अंदाज यातील कोणत्याही लेखाला वाचल्यानंतर उमजून येईल. पृथ्वीच्या उत्पत्ती, सूर्याच्या, अग्नीच्या, पावसाच्या इतकंच नाही, तर मिठाच्या उत्पत्तीच्या लोककथांचा प्रवास कविता महाजनांच्या प्रवासाशी एकरूप होऊन रूढार्थानं प्रवासवर्णन नसलेलं एक अचंबित करणारं पुस्तक तयार झालंय. ब्लॉगसाठी लिहिल्या गेलेल्या या प्रवासनोंदी. पण अत्यंत गंभीर आणि अनंत तपशिलांना कवेत घेणाऱ्या.

'आज पावसात वारे घुसले होते. त्यामुळे पाऊस एखाद्या बेवड्यासारखा झुलत होता. सरी कधी इकडे कधी तिकडे. निव्वळ अनागोंदी.' हे वर्णन करीत कधी फिलिपाईन्समधील लोककथा आपल्याला उलगडत जाते.

समुद्राचं पाणी खारं का झालं, याच्या भारतातल्या, जर्मनीतल्या, डेन्मार्कमधल्या, आईसलँडमधल्या, नॉर्वेमधल्या समसमान शेवट असलेल्या भिन्न कथा वाचत आपण वसईतील मिठागरांतून तयार झालेल्या वास्तवकथेकडे वळतो. कधी स्कंदपुराणातील दाखले मिळतात, तर कधी हिंदीतील प्रेमचंद आणि अभिजात कवींचे. एका ठिकाणी मराठी काव्यविश्वानं 'आऊटसायडर' ठरवलेल्या मनोहर ओकांच्या कवितेतलं वाक्यदेखील या प्रवासगोष्टींना इच्छित स्थळी पोहोचवतं. सिक्कीममधील गंगटोक, उत्तराखंडमधील काठगोदाम आणि मेघालयातील मॉलिनाँग या गावांतील स्वच्छसाम्यता दाखविताना कविता महाजनांमधील ललित लेखक डोकावते, तर राजस्थानमधील अग्निनृत्याची प्रथा आणि कैक आदिवासी जंगलांमधील वर्णनं वाचताना त्यांच्यातील आदिम गोष्टींची अभ्यासक सापडते. नामवर्णनाची एक भलीमोठी अद्भुत जत्रादेखील येथे पाहायला मिळते. अशा प्रकारचे प्रवासातल्या प्रवासात लोककथा-दंतकथा आणि कल्पकथांना एकत्र आणणारं हे मराठीतलं एकमेव पुस्तक ठरावं. कविता महाजनांमधील कवी, लेखिका, चित्रकार आणि भटकबहादर व्यक्तिमत्त्व या सर्वांचा इथे एकत्रित ठसा दिसतो, हे मला सर्वाधिक महत्त्वाचं वाटतं.

**पंकज भोसले**

# अनुक्रम


१. आभाळाचा कागद, समुद्राची शाई । १७
२. धरतरी माझी मायु रं, तिच्यावं पाय कसा मी ठेवू रं । २१
३. बिघडलेलं दुरुस्त करणारे जादूगार बैगा । २४
४. दाट काळं धुकं आणि फान्गु । २९
५. समुद्राची निर्मिती आणि सूर्यचंद्राची वाटचाल । ३४
६. भई जब लाखो उदला वायरो । ३९
७. पाऊस आणि अश्रू । ४३
८. मस्तवाल मेघ आणि सावरीचा देहगंध । ४६
९. उत्तराषाढाची सुफळ संपूर्ण कहाणी! । ४९
१०. पाऊस आणि वाऱ्याचं युद्ध! । ५२
११. रौद्रभीषण ते प्रेममधुर । ५६
१२. लावण्याची देवता आणि प्रलय । ५९
१३. चिमूटभर मिठाच्या समुद्राएवढ्या गोष्टी! । ६२
१४. मिठाचा शुभ्र खारट खडा! । ६८
१५. वेगळ्या जागेवरून पाहताना । ७२
१६. कार निकोबार आणि नारळ । ७९
१७. साकाचं बेट । ८२
१८. सासूसुनांच्या विहिरी आणि तळी । ८५
१९. रहिमन पानी राखिये । ८८
२०. जीवट डोकऱ्या माशाची गोष्ट! । ९१
२१. त्यांना दुसरे हृदय दे, वा मला वेगळी भाषा! । ९४

२२. बगळ्या बगळ्या कवडी दे । ९७
२३. कुरजां ऐ म्हारा भंवर मिला दीजो ऐ । १००
२४. जिवंत होणारी चित्रं । १०३
२५. इज्जत जाईल, पण प्रियकर राहील! । १०६
२६. आईच्या आधी लेकीला न्हाण आलं हो...! । १०९
२७. तुमच्या हातात एक फूल दिलं, तर... । ११२
२८. इसामई काला लगी सोना । ११५
२९. पलाश... धगधगती अग्निफुले... । ११८
३०. एको आणि नार्सिसस । १२१
३१. फूल जंगल मे खिले किन के लिये । १२४
३२. महुआ बीने दोहर होये जाय । १२८
३३. लोकल दारवा आणि चखणे! । १३१
३४. सुपारी माझी आईबाई! । १३४
३५. सर्वांत स्वच्छ गावं... । १३७
३६. निंदिया सतावे मोहे । १४२
३७. तू-ती आणि रेशमी प्रेमाचा लोचा । १४५
३८. न नींद नैना, ना अंग चैना । १४८
३९. साता प्रश्नांची कहाणी । १५२
४०. जे तुमच्याकडे नाही, ते माझ्याकडे आहे । १५६
४१. सात जिभांचा अग्नी आणि पुलोमाचे अश्रू । १५९
४२. सतगुरू सिंवरो मोवण्या, जिण ओ संसार उपायो । १६३
४३. सांवरे अई जइय्यो जमुना किनारे । १६६
४४. कार्तिकेयाचं मंदिर आणि चैत्रातली जत्रा । १६९
४५. सीतेची तहान । १७३
४६. वाटमोड अर्थात डेडएंड! । १७७

# १

# आभाळाचा कागद, समुद्राची शाई

समुद्री हिरव्या रंगाच्या रेषांचे आखीव शुभ्र ताव, पावसात भिजलेल्या कावळ्याच्या पंखांसारखी काळी कुळकुळीत शाई आणि नाजूक सोनेरी पत्तीची जीभ असलेलं लाल मातीच्या रंगाचं पेन... असं साहित्य जमलं, की लिहावं वाटतंच. गुलाबी पायांचे पांढरे पक्षी स्थलांतर करून यावेत आणि इथं अन्न मिळेल हे ओळखून अलगद किनाऱ्यावर उतरावेत, तशा लाखो कल्पना मनात अलगद प्रवेश करतात. किती गोष्टी आहेत, ज्या कागदांना सांगायच्या बाकी आहेत. कादंबरी, कविता, कधीमधी लहानग्या कथा... असं सारं लिहूनदेखील खूप शिल्लक असतं. शिल्पकार मातीच्या गोळ्याला आकार देत शिल्प बनवतात वा दगडाचे छिलके काढत त्यातून आत लपलेलं शिल्प बाहेर काढतात; तसंच काय लिहायचं, हे बहुतांश वेळा मनात स्पष्ट उमटलेलं असतं आणि मग त्याच्या आजूबाजूचं अनावश्यक काळजीपूर्वक, बारकाईनं बाजूला काढून ठेवत कलाकृती घडवत न्यायची असते. या बाजूला काढलेल्या गोष्टी टाकाऊ असतात असं नव्हे, उलट अनेकदा मोठ्या रसाळ आणि रोचक असतात. त्यांना अशा छोटेखानी लेखात जागा देता येते.

आज अशाच अजून एका लेखमालेचा प्रवास 'घुमक्कडी' या सदरातून सुरू करतेय. अनुभवलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या, सुचलेल्या, स्वप्नात दिसलेल्या गोष्टींचा हा प्रवास आज सुरू करताना मला खूप उत्साह वाटतोय.

घुमक्कडी आणि गोष्ट या दोन्ही बाबी माझ्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आहेत. न आखलेले, परतीचं तिकीट न काढता केलेले प्रवास मला फार आवडतात. प्रवासात अगणित गोष्टी गोळा होतात. माझ्याशी जंगल बोलतं; पक्षी-प्राणी बोलतात; समुद्र-नद्या-तळी आणि मासे-कासवं-मगरी बोलतात; चांदण्यांनी माखलेलं वा ढगांचे काळे ढोल वाजवणारं आभाळ बोलतं. माणसं तर बोलत असतातच. आपले आणि इतरांचे कैक अनुभव गाठीशी जमा होतात. या अनुभवांमध्ये सारं कसं छान-छान आणि सुखा-समाधानाचंच असतं, असं अजिबात नाही. अडथळे, अडचणी, संकटं, प्रश्न... आणि या

# ५

# समुद्राची निर्मिती आणि सूर्यचंद्राची वाटचाल

चीनमधली तिसरी गोष्ट आहे नैसर्गिक संकटाची आणि त्यामुळे झालेल्या उलथापालथीची.

आकाश आणि पृथ्वी दुरावलेले होते आणि माणसं सर्वदूर विखुरली होती, त्यामुळे दीर्घकाळ लोक शांतपणे जगत होते; जगणं सुखकारक व्हावं म्हणून नवनवीन मार्ग शोधत होते. सारं काही छान सुरळीत चाललेलं होतं. अशा निवांत अवस्थेत एक प्रचंड महान अपघात घडला आणि आकाश व पृथ्वी पुन्हा जवळ येऊ लागले. त्या भयावह उत्पातात आकाशाला एक मोठी भेग पडली आणि पृथ्वीवर भूकंप होऊ लागले. ज्वालामुखींनी आपली तोंडं उघडली आणि निखाऱ्यांच्या लालकेशरी अक्राळविक्राळ नद्या वेगानं धावत पर्वतांवरून खाली ओघळू लागल्या. त्यांच्या तावडीत सापडलेल्या प्रत्येक गोष्टीचं पापणी लवायच्या आत काळ्याकरड्या राखेत रूपांतर होत होतं. सर्वत्र धूर आणि गरम वाफा पसरल्या होत्या. हिरवीगार जंगलं त्या लाव्ह्यानं गिळून टाकली. प्राण्यापक्ष्यांसह रानं, माळरानं, शेतं सारंकाही नष्ट केलं. लाव्ह्याची झळ इतकी तीव्र होती, की लहान-मोठे डोंगर भुईसपाट झाले. दरडी कोसळू लागल्या. त्यामुळे नद्या गोंधळून विस्कटल्या आणि उधाणून धावताना त्यांना मोठे पूर आले. आगीतून वाचलं, ते पाणी नष्ट करू लागलं. असंख्य जीव मृत्युमुखी पडले आणि गिधाडं-घारी व भुतंप्रेतं त्यांच्यावर ताव मारायला अधाशासारखी तुटून पडली. या सगळ्यांतून जी माणसं बचावली; ती आक्रोश करत, आपल्याला घडवणाऱ्या 'न्युवा' या देवतेची प्रार्थना करू लागली.

न्युवाच्या कानी ही प्रार्थना पडेपर्यंत पुष्कळ विध्वंस झालेला होता. तिनं प्रथम पूर थोपवले, ज्वालामुखी शांत केले, मग नरभक्षकांना मारून टाकलं आणि त्यानंतर फाटलेल्या आभाळाला शिवायचं ठरवलं. आभाळ शिवणं सोपं नव्हतंच. आधी भेग भरून काढायची होती. तिनं लाकडं, गवत जमवून आभाळापर्यंत पोचणारी रास तयार केली. आभाळासारखे निळे दगड मात्र तिला शोधूनही सापडले नाहीत. मग जे काही काळे, पांढरे, लाल, पिवळे

# ८

# मस्तवाल मेघ आणि सावरीचा देहगंध

पाऊस माणसाला कन्फ्यूज करतो. शांत चित्तानं काम करत असताना मध्येच मनात उलटसुलट विचार येत राहतात. कधी वाटतं, की 'प्रेम केलं नसतं, तर आपल्या हातून अजून पुष्कळ काम झालं असतं'; तर दुसऱ्या क्षणी मनात येतं, की 'प्रेम केलं म्हणून आजवर इतकं तरी काम करून झालं.' पाऊस म्हणजे अश्रू, अशा कथांच्या सोबतच पाऊस म्हणजे प्रेम, हे सांगणाऱ्या कथाही आहेतच. पाऊस नसला, की दुष्काळ, 'मापा'त पडला, की सुकाळ आणि अति पडला की वाताहत; प्रेमाचंही तसंच, दक्षिण आफ्रिकेतली एक पावसाची गोष्ट यावरून आठवली.

दुष्काळानं सर्वत्र रखरखाट झाला होता. या भूमीवर चुकून ढग आलेच, तर ते इतके उंचावर असत, की त्यांना ही भूमी दिसायचीच नाही आणि ते आपल्याच नादात पुढे सरकत दूर निघून जायचे. पाऊस नाही म्हणजे पाणी नाही, पाणी नाही म्हणजे अन्नही नाही. भूकतहानेनं सारे व्याकूळ होऊन मरायला टेकले. सगळ्या प्रार्थना व्यर्थ जाऊ लागल्या. सगळ्या उपाययोजना थकल्या. काय करावं, हे काही कुणाला सुचेनासं झालं. अशात एक नवल घडलं.

एक पुष्ट, मस्तवाल आणि पाण्यानं गच्च भरलेला काळा मेघ आकाशातून जाताना जोराचे वारे वाहू लागल्यानं गडबडून उंचावरून थोडा खाली आला. इथंही उष्ण वारे होतेच, पण त्या लहान झुळका होत्या. त्यातली एक झुळूक विलक्षण वेगळा गंध घेऊन आली होती. मेघ त्या गंधानं अगदी वेडावून गेला. त्यानं त्या झुळकीला विचारलं, "जीव कासावीस करणारा हा कसला गंध आहे, ते मला सांगशील का?"

इतका मस्तवाल मेघ नम्रपणे विचारतोय म्हणून झुळूक खुशालली. ती म्हणाली, "अजून थोडा खाली जा आणि धरतीवर नीट वाकून पाहा. तिथं तुला सावुरी नावाची तरुणी दिसेल, हा तिचाच देहगंध आहे."

मेघ हलकेच खाली आला. त्याला पृथ्वीकन्या सावुरी दिसली. ती काळी कांती एखाद्या चमकदार ओलेत्या कणखर खडकासारखी घट्टमुट्ट दिसत

होती. तिचे कुरळे केस दवबिंदू ल्यालेल्या तुतीच्या फळांसारखे दिसत होते. या दुष्काळी औदासीन्यातदेखील ती ताठ कण्यानं आणि आत्मविश्वासानं आकाशाकडे बघत उभी होती. मेघानं पृथ्वीवर आयुष्यात कधी इतकं देखणं काही पाहिलं नव्हतं. तो तिच्या प्रेमात वेडावून अजून अजून खाली खाली उतरत आला, तसतसा तिचा देहगंध त्याला अधिक तीव्रतेनं जाणवू लागला. मग एकाएकी त्याला भान आलं, की तो असाच धरतीवर उतरला; तर पाणी होऊन नष्ट होईल. मग त्यानं एका बैलाचं रूप धारण केलं आणि विजेचा दोरखंड करून तो उतरू लागला. आपले चारी पाय धरतीवर टेकवून, पायांत वीज भरून तो सावुरीच्या दिशेनं निघाला.

मेघ खाली येताना सूर्य झाकोळला आणि वातावरण काळोखं बनलं. विजांच्या कडकडाटानं धरती कापू लागली. सगळे प्राणीपक्षी आपापल्या गुहांमध्ये, बिळात, ढोलीत, घरट्यांत दडले. माणसं आपापल्या झोपड्यांमध्ये शिरली. पाऊस येणार याचा आनंद वाटतोय की भय वाटतंय, हेच काही कुणाला कळेनासं झालं. सावुरीही आपल्या झोपडीत गेली आणि एकाएकी तिला गाढ झोपेनं घेरलं. बैलरूपी मेघ सावुरीच्या झोपडीजवळ येऊन थबकला. त्यानं खिडकीतून डोकावून पाहिलं, तर एवढ्या वाऱ्यावावदानात, विजांच्या धिंगाण्यातदेखील सावुरी शांत झोपून गेलेली दिसली. धावून आलेल्या मेघाच्या निःश्वासांनी, तो इतक्या जवळ आल्यानं, धरती दवानं ओली झाली. मृदगंध दरवळू लागला, त्यानं जादू झाली. मातीच्या सुगंधानं सावुरीची झोपडी भरून गेली आणि सावुरी जागी झाली.

सावुरीनं पाहिलं, की एक काळाभोर देखणा बैल आपल्या झोपडीच्या दारात उभा आहे. त्यानं शरणागतासारखे कान पाडलेत, उंचावलेली गोंडेदार शेपटी तो खाली घेतोय आणि पुढचे दोन्ही पाय गुडघ्यांवर टेकवून तिच्यासमोर खाली बसतोय.

तिनं मऊ केसाळ कातडीपासून बनवलेलं, धाग्यांनी सुंदर रेशीमकाम केलेलं 'कारोस' अंगाभोवती घट्ट लपेटून घेतलं. तरी बैलाच्या घामाचा गंध तिच्या नाकात घुसलाच. ती वश झालेली पाहून बैलानं धरतीवर आपले खूर जोरानं आपटले आणि दमदार मेघगर्जनेचा हुंकार भरला. त्याच्या काळ्याभोर डोळ्यांत, सावुरीला आपल्यासोबत घेऊन जाण्याच्या इच्छेची वीज नाचत होती. सावुरीला कळलं, की बैलाचा आकार आणि पुरुषाचं मन यांच्यात मेघ दडलेलाय. पाऊसपाण्यानं गच्च दाटून भरलेला काळाभोर मेघ! त्याचा गंधच सांगतोय हे सारं!!

# १०

# पाऊस आणि वाऱ्याचं युद्ध!

आज पावसात वारं घुसलं होतं. त्यामुळे पाऊस एखाद्या बेवड्यासारखा झुलत होता. सरी कधी इकडे कधी तिकडे. निव्वळ अनागोंदी, त्यावरून 'फिलिपाईन्स'मधली एक लोककथा आठवली.

एके दिवशी सर्वत्र सुरेख सोनेरी उन्हं पडली होती. आभाळातून एक निरुपद्रवी ढग निवांत भटकत जात होता. तो मजेत फिरतोय हे पाहून वारा आणि पाऊस त्याच्या पाठीवर जाऊन बसले. ते काही कष्ट न करता मजेत गप्पा मारत जाताहेत, याचा विजेला आणि वादळाला राग आला. ती दोघंही घाईघाईनं ढगाच्या पाठीवर येऊन बसली. ढगाची या सगळ्यांशीच दोस्ती होती. त्यामुळे त्याला यात काही वावगं वाटलं नाही. तो तसाच इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरत राहिला. वादळानं हळूच काड्या करायला सुरुवात केली. ते म्हणालं, ''मला तर बुवा कंटाळा आलाय. हे काय नुसतं फुसक्या गप्पा छाटत बसायचं?''

वारा म्हणाला, ''कामाच्या वेळी काम करतोच की आपण, आता थोडा वेळ आहे म्हणून बसलोत निवांत, तर काय झालं?''

''छे छे... मला हे अजिबात पटलेलं नाहीये. निदान काहीतरी खेळायला तरी हवं.'' वादळ म्हणालं. त्याचं हे म्हणणं विजेला लगेच पटलं. ती म्हणाली, ''हो बाई, एका जागी न कडाडता जास्त वेळ बसून राहिलं; तर मला आजारी पडल्यासारखंच वाटतं.''

वादळाचा खेळ होतो, पण लोकांचा जीव जातो, हे वाऱ्याला माहीत होतं. त्यामुळे तो म्हणाला, ''मला या मऊ मऊ ढगावर नुसतं पडून राहायलाच मजा येतेय. मी नाही खेळणार.''

पाऊस इतका वेळ गप्प होता, तो वैतागून म्हणाला, ''जरा वेळ तरी शांत राहा रे. काय सारखी वटवट करताय?''

विजेनं वादळाला कोपरानं ढोसलं आणि वादळ ढगावर उभं राहून नाचू लागलं. वीज त्याला साथ देऊ लागली. ढगाला अजूनही वाटत होतं, की हे सगळं गमतीत चाललंय. पण मग वादळानं दुसरी काडी केली. ते म्हणालं,

# २१

# त्यांना दुसरे हृदय दे, वा मला वेगळी भाषा!

बायबलमध्ये 'टॉवर ऑफ बॅबेल' नावाची एक गोष्ट आहे. कोणे एके काळी माणसं एकच भाषा बोलत होती. त्यांच्यात सुसंवाद आणि एकवाक्यता होती. माणसांनी स्वर्गापर्यंत पोहोचणारा एक मनोरा बांधायला घेतला. तो पूर्ण झाला, तर संकट ओढवेल, हे जाणून देवांनी पृथ्वीवर गोंधळ निर्माण करण्याचं ठरवलं. प्रत्येक माणसाच्या कानात त्यांनी काही सांगितलं आणि त्यामुळे सगळ्यांच्या भाषा वेगळ्या बनल्या. एकाचं दुसऱ्याला कळेना. ही माणसं एका जागची विखरून जगभर पांगली. त्यांच्यात वाद, विसंवाद, भांडणं, युद्धं होऊ लागली. एकोपा संपला...

मेघालयातल्या एका लोककथेची सुरुवात अशीच आहे. त्यात केवळ माणसांचीच नव्हे; तर पृथ्वीवरच्या तमाम सजीव-निर्जीवांची आणि अगदी वारे, पाऊस, आग, उन्हं, जलाशयं, डोंगर इत्यादिकांचीदेखील 'एकच भाषा' होती, असं म्हटलंय.

गोष्ट अशी आहे -

कोणे एके काळी सगळे एकाच भाषेत बोलत असत.

तेव्हा एक खासी जमातीमधले एक राजा-राणी राज्य करीत होते. मूलबाळ नाही, म्हणून ते दुःखी होते. मात्र एकेदिवशी त्यांना राणी गरोदर असल्याची आनंदाची बातमी मिळाली. बाळंतपणाच्या वेळी तिच्यासोबत माहेरचं कुणी असावं, म्हणून राणीच्या बहिणीला बोलावून घेण्यात आलं. पण राणीच्या बहिणीला राणीचा मत्सर वाटू लागला. राजा-राणी आनंदात आहेत, हे काही तिला बघवेना. राणीला तिळी मुलं झाली. दोन मुलगे आणि एक मुलगी. राणीच्या बहिणीनं त्या तिन्ही बाळांना एका टोपलीत ठेवलं आणि टोपली नदीच्या पाण्यात वाहवून दिली.

मग ती रडत रडत राजाकडे गेली आणि म्हणाली, ''माझी बहीणच कमनशिबी आहे. तिनं मानवी मुलं जन्माला न घालता तीन भयानक नाग जन्माला घातलेत. हे नाग इतके विषारी असतात; की त्यांचं विष कुणा माणसाच्या वा प्राण्याच्या डोळ्यांत गेलं, तर ते तीव्र वेदनेनं किंचाळत

# २७

## तुमच्या हातात एक फूल दिलं, तर...

सप्टेंबर हा रानफुलांचा महिना. कास पठाराचा गाजावाजा होऊन तिथं पर्यटनावर निर्बंध घालण्याआधीच एकदा तिथं सुखानं फिरून आले होते. तरी तळ्याजवळ जाऊनही पाण्याला हातापायांचा स्पर्श करता आलेलाच नव्हता. काठावर बिअरच्या बाटल्यांच्या काचांचा खच होता आणि दगडांवर उगाचच रिकाम्या बाटल्या फोडून लोक पाण्यात फेकतात. त्यामुळे पायातले बूट काढून अनवाणी फिरण्याची सोयही राहिलेली नाही. विस्तीर्ण माळरानावर जांभळ्या टोपल्या बघत मनसोक्त फिरून झालं. शुभ्र ओल्या कागदावर निळी शाई शिंपडून फुलं उमलावीत तशी टिकलीएवढी निळी अन् पांढरी फुलं एकेजागी होती. त्यांचं नंतर मी एक चित्रही काढलं.

वेगवेगळ्या जागा, वेगवेगळी दृष्टी देतात. पहाड-पर्वत उंची आणि खोली या शब्दांचा अर्थ समजावून सांगतात. समुद्र आणि आकाश विस्तीर्णतेची आणि अज्ञाताची आठवण करून देतात. झऱ्यांनी खेळकरपणा कळतो, कधी नाचरेपणादेखील! धबधबे कोसळण्याची महती सांगतात, नद्या वाहत - चालत राहण्याची. जंगल, गुहा गूढ गोष्टी समजावतात. तसं पठार आपला मर्यादित ठहराव सांगतं. जास्त उंच जाण्याची दर वेळी गरज नसते, आपल्या कुवतीइतकं वाढावं आणि विस्तारावं, अशी ती मध्यमवर्गीय वृत्ती. इथं कोसळण्याची भीती नसते, ऑक्सिजन कमी पडून श्वास घेण्यास त्रास होणार नसतो, वादळ नसतं, बुडणं-वाहून जाणं नसतं... सपाट माळरानावर पायवाटांनी चालत राहायचं फक्त...! पण म्हणून त्याला कमी लेखण्याचं कारणच नाही. लाख फुलांनी माखल्यावर तर पठाराला कुणी नावं ठेवूच शकत नाही. इथं शेकडो भुंगे, मधमाशा, फुलपाखरं, असंख्य अनोळखी किडे गुणगुणत नाचत, उडत असतात. आपले पाय आपोआप नाचरे होतात. पावलं सरळ पडत नाहीत, ती आतल्या आत नाचू लागलेली असतात. फुलांचा, झुडपांचा, गवताचा वास श्वासांत भरतोय, त्यानं एक गोडूस मळभ मनावर पसरतं. अजून उन्हं यायची असतात. ती येऊ लागली, की रक्तात उसळी निर्माण होते... फक्त आणि फक्त नाचावं आणि नाचतच

## ३५

# सर्वांत स्वच्छ गावं...

गंगटोक, काठगोदाम आणि मॉलिनाँग या तीन स्थळांमध्ये काही साम्य आहे म्हटलं, तर नवल वाटेल. गंगटोक सिक्कीममधलं प्रसिद्ध 'हिल स्टेशन', काठगोदाम हे उत्तराखंडमध्ये फिरण्यासाठी जायचं, तर शेवटचं रेल्वेस्टेशन आणि मॉलिनाँग हे पार मेघालयातलं एक अगदी लहानगं खेडं! यांच्यातलं साम्य आहे स्वच्छता!

'गंगटोक' भारतातलं सर्वात स्वच्छ हिलस्टेशन म्हणून ओळखलं जातं. काठगोदामचं रेल्वेस्टेशन हेही देशातलं सर्वात स्वच्छ रेल्वेस्टेशन असल्याचा पुरस्कार मिरवताना दिसतं आणि 'मावलीनांग' तर भारताबाहेरचाही सन्मान मिळवून अवघ्या आशिया खंडातलं सर्वांत स्वच्छ गाव ठरलंय.

काठगोदामला मी पोहोचले, तेव्हा पहाट व्हायची होती आणि पुढच्या प्रवासाची उत्सुकता असल्यानं उजाडायची वाट न पाहता, लगेच पहाडांच्या हाका ऐकत निघाले. परत येताना मात्र दरम्यानच्या दिवसांत उत्तराखंडमध्ये नैसर्गिक प्रकोप झाल्यानं रस्ते नीट मोकळे झाले असतील की नाही, कोसळलेल्या दरडींची माती- दगड बाजूला काढले गेले असतील की नाही, याची धाकधूक असल्यानं दोनेक तास आधीच निघाले होते. त्यामुळे काठगोदामला पोहोचून एका हॉटेलात जेवून स्टेशनवर आले आणि इतकं स्वच्छ व देखणं स्टेशन पाहून चकित झाले. वेटिंगरूममध्ये न बसता चक्क तासभर या टोकापासून त्या टोकापर्यंत फेऱ्या मारल्या निवांत. गजबज होतीच, पण गलका-गोंधळ नाही. पर्यटकदेखील अशा जागी ओशाळून शहाण्यासारखे वागू लागतात, त्यामुळे कुणी इकडेतिकडे कचरा टाकत नव्हतं. चुकून कुठं कचरा पडलाच, तर लगेच स्वच्छ केला जात होता. स्वच्छता कर्मचारीही छान गणवेशात, हातमोजे घालून हसतमुखानं काम करत होते.

गंगटोकला हेलिकॉप्टरचा पर्याय आहे, पण तो फारतर परतीच्या प्रवासात निवडावा. तिस्ता नदीच्या काठाकाठानं जाणाऱ्या रस्त्यावरून बसमधून प्रवास करणं जास्त छान; कारण बसच्या उंचीमुळे कारमधून गेल्यावर दिसणाऱ्या दृश्यांहून वेगळ्या पातळीवरून दृश्यं दिसतात आणि अधिक मजा येते.

## ४६

# वाटमोड अर्थात डेडएंड!

चालता चालता आकस्मिक ध्यानात येतं, की इथून पुढे वाट नाहीये. ती मोडलेली आहे चक्क. जंगलातून चालताना पुढे एकदम हिरव्या काळोखाची गर्द राई दिसते, तिच्यात माणसांनी घुसणं अशक्य. डोंगरदऱ्यांमधून भटकताना अवचित कडा सामोरा येतो. मागे वळ सांगणारी थेट उभी कोसळण! शहरांमध्ये फिरताना एखादी भिंत आडवी येते. शहरात अनेक जागी पाट्याही असतात डेडएंडच्या. 'वाटमोड' हा मराठी शब्द मला डेडएंड या शब्दाहून जास्त आवडतो. त्यात संपणं वा शेवटही सूचित केलेला नाही आणि मृत्यू तर नाहीच नाही. वाट फक्त 'मोडली' आहे, त्यामुळे इथून वळा, मागे फिरा वा डावीउजवीकडे जा आणि दुसऱ्या कुणा वाटेनं मंझील गाठा, मुक्कामी पोहोचा! यात सकारात्मकता आहे.

गेले वर्षभर मी 'घुमक्कडी' लिहितेय, तरी लाखो गोष्टी अजून शिल्लक आहेत... अगदी शेकडो वर्षं सांगता येतील इतक्या गोष्टी. अनेकविध स्थळांच्या, वेगवेगळ्या काळातल्या, शेकडो भाषांमधल्या विश्वउत्पत्तीच्या कथा, सृष्टिकथा, पुराकथा, लोककथा, दंतकथा... एक ना दोन, अनेक प्रकारच्या कथा. एका आदिवासी जमातीत 'गप' नावाचा लोककथांचा प्रकार ऐकला होता, प्रमाण मराठीत त्याला 'थाप' म्हणू या. ही 'थाप' सांगणाऱ्या माणसाच्या कल्पनाशक्तीनुसार कितीही विस्तारत जाऊ शकायची. अतिशयोक्तीचा महामेरूच तो..

''घरात कंटाळा आला. छपरातून उडी मारली. पुढच्या क्षणाला दाट जंगलात पोहोचलो. फार तहान लागली, पण पाणी काही दिसेना. मग बोरीच्या झाडावर सरासरा चढलो. शेवटच्या फांदीवर जाऊन सगळ्यांत वरच्या काट्यावर उभा राहिलो, तर चार झाडांच्या पुढेच समुद्र होता. समुद्राच्या पाण्याचा इतका गोड वास घमघमत होता, जणू महुवाच्या पर्वताएवढ्या राशी त्यात ओतल्या आहेत. घाईनं पुढे गेलो, तर एक कोलंबी आडवी आली. तिचं तोंड पूर्वेकडे आणि शेपूट उत्तरेकडे. ती इतकी लांब-रुंद-उंच होती, की आभाळातला सूर्यही दिसेना. पाणी प्यायचं, तर